**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
***Online ISSN 2278-8808, SJIF 2016 = 6.17, www.srjis.com***
***UGC Approved Sr. No.45269, SEPT-OCT 2017, VOL- 4/36***

# म. कर्वे यांच्या सामाजिक कार्याचा अभ्यास

सौ. **सुचिता** राजू पवार & अनुराधा सहस्त्रबुद्धे, **Ph. D.**
***टिळक महाराष्ट्र विद्यापीठ गुलटेकडी, पुणे,37***

***Abstract***

स्त्री शिक्षणाच्या कामातील योगदानासाठी म. कर्वे यांना सन १९५८ साली 'भारतरत्न ' हा सर्वोच्च पुरस्कार प्राप्त झाला. त्यांचे स्त्री शिक्षणाचे कार्य खरोखरच अजोड आहे. मंगला आठलेकर 'महर्षी ते गौरी' (स्त्री शिक्षणाची वाटचाल) (१९९९) या पुस्तकात त्यांचा उल्लेख समाज सुधारक असा करतात. वधवांसाठी शिक्षणाच्या कार्याची मुहूर्त मेढ रोवतानाच खरतर त्यांच्या सामाजिक कार्याची सुरूवात झाली. सन १८९१ सालीम. कर्वे यांची पहिली पत्नी राधाबाई यांचे निधन झाले तेव्हा त्यांना दुसरा ववाह करण्याचा आग्रह करण्यात आला. परंतुम. कर्वे त्यासाठी तयार नव्हते. तरीही 'दुसरा ववाह केला तर वधवेशीच करेन' हा मात्र त्यांचा दृढ निश्चय होता आ ण त्याप्रमाणे सन १८९३ साली मार्च महिन्यात म.कर्वे यांनी आनंदीबाई जोशी या वधवेशी पुन र्ववाह केला. समाजात एकच खळबळ उडाली. वर्तमान पत्रातून टिका झाली. कर्मठ लोकांनी त्यांना वाळीत टाकले. हीच त्यांच्या सामाजिक कार्याची सुरूवात होय. स्त्रियांना समाज व कुटुंबात दुय्यम दर्जाची वागणूक होती. पण वधवांची स्थिती मात्र मरणाहूनही भयंकर होती. म. कर्वे यांनी पं. रमाबाईंचे वधवा शिक्षणाचे कार्य जवळून पाहिले होते. त्यातूनच प्रेरणा घेऊन त्यांनी त्यांच्या शारदासदनातील वधवेशी ववाह करून समाजास एक आदर्श उदाहरण घालून दिले. त्यानंतर त्यांनी वधवा शिक्षणाचे कार्य हाती घेतले. म्हणजे प्रथम समाज सुधारक म्हणूनच त्यांच्या कार्याला सुरुवात झाली. या समाजकार्यातून शैक्ष णक कार्य घडत गेले आ ण स्त्रीसाक्षर, सबला, स्वावलंबी बनली. आपले संपूर्ण आयुष्य त्यांनी स्त्री शिक्षणासाठी वेचले परंतु त्याच बरोबर ते समाज कार्य ही करीत होते. वधवेशी पुन र्ववाह हा त्यांच्या समाजक्रांतीचा श्री गणेशा होता. शिक्षण, वधवा पुन र्ववाह, लोकजागृती, अनाथ बा लका श्रमाची स्थापना, जातीभेदास वरोध, केशवपनास प्रतिबंध, प्रौढ शिक्षण वर्ग, निष्काम-कर्म-मठाची स्थापना, भाऊबीज निधी उपक्रम, समतासंघ, समाज प्रबोधन इ. अनेक समाज उपयोगी कामे त्यांनी केली म्हणूनच ते एक समाज सेवक व समाज सुधारकही होते हे नि र्ववाद सत्य आहे. देशातील धर्म सुधारणेचे व समाज सुधारणेचे सगळे महत्वाचे उपक्रम व शिक्षण वषयक वेगवेगळे प्रयोग त्यांनी जवळून पाहिले. न्या. रानडे यांचा उदारमतवादी समाज सुधारणा वचार, गोपाळ गणेश आगरकर यांचा अमुलाग्र सुधारणा वचार आ ण गोपाळकृष्ण गोखले यांचा भारत सेवक समाज यांचा परिणाम म. कर्वे यांच्या वचारांवर व कृतींवर झाला. म. कर्वेयांचे जीवन चरित्र हे गेल्या दोन शतकातील महाराष्ट्राच्या समाजेतिहासातील एक मोलाचा व तेजस्वी अध्याय आहे याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही (खोले २०१५)'. मालती देशपांडे म्हणतात 'म. कर्वे म्हणजे महाराष्ट्राच्या शैक्ष णक व सामाजिक इतिहासाच्या एकाक्रांती कारकशतकाचे मूर्तिमंत साक्षीदार होय." कारण आपल्या प्रदीर्घ आयुष्याचा कण अन कण त्यांनी समाजसेवेसाठी, समाज सुधारणेसाठी वेचला. (१९९७)

***Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com***

संशोधनाची उद्दिष्टे:

1) म. कर्वे यांच्या सामाजिक कार्याचा अभ्यास करणे.

2) म. कर्वे यांच्या सामाजिक कार्याचे मूल्यमापन करणे.

संशोधनपद्धती: ऐतिहा सक व सर्वेक्षण.

न्यादर्श: ५० (शैक्ष णक वर्ष १९३७ते १९७८)

म. कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या माजी वद्या र्थनी.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

माहिती संकलनाचे साधन: प्रश्नावली

वषय वश्लेषण :

म. कर्वे यांनी बाल वयातच त्यांच्या गुरूजींच्या सांगण्यावरून फावल्यावेळात मंदिरात बसून गावातील लोकांना वर्तमान पत्र वाचून दाखवून सार्वजनिक प्रश्नांची लोकांना माहिती करून देण्याचे काम सुरू केले 'हाच माझा सार्वजनिक कामातला पहिला धडा होता' असे म. कर्वे आपल्या आत्म वृत्तात लहितात. पहिली पत्नी राधाबाई यांच्या मृत्युनंतर त्यांच्या स्मरणार्थ मुरुड गावातील शाळेला त्यांनी पाचशे रुपये इतकी रक्कम दिली व त्याचा उपयोग मुरुड गावात इंग्रजी शक्षण व स्त्री शक्षणासाठी करावा अशी अट घातली.

१२ जून १८८३ च्या केसरी अंकात वधवांच्या स्थिती संबंधी हृदय हे लावून टाकणारे एक पद प्र सद्ध झाले. ते वाचून म. कर्वे यांचे वधवांबद्दलचे दु:ख उन्मळून आले. व समस्त स्त्री जाती वषयी सहानुभूती निर्माण झाली. त्यांनी स्वतः वधवेशी पुन र्ववाह केला. आ ण सन 1893 साली ' वधवा ववाहोत्तेजक मंडळीची 'स्थापना करून वधवा पुन र्ववाहाचे कार्य हाती घेतले. वधवांना पुन्हा ववाह करता यावा असे उच्च वचार असणारे आद्य प्रवर्तक पं. ईश्वर चंद्र वद्या सागर व वष्णू शास्त्री पं डत यांच्या मार्गाने आपल्या कार्याचा वस्तार करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. वधवांच्या ववाहासाठी उत्तेजन दिले. एवढेच नव्हे तर पुन र्ववाहितांचे कुटुंब मेळे भरवले. त्यातून अनेक सहकारी मळाले व म. कर्वे यांच्या या कार्यास हातभार लागला. दर पाच वर्षांनी एकदा पुन र्ववाहित कुटुंबाचा मेळा भरत असे. त्यामुळे अनेक पुन र्ववाह घडून आले. परंतु यामुळे समाजाचा वरोध वाढला. वधवांनी पुन्हा ववाह करणे तत्कालीन समाजास मान्य नव्हते. वधवा ववाहाचे कार्य लोक मताला न दुखावता करणे असा वचार करून त्यांनी ' वधवा ववाहोत्तेजक मंडळी ' या संस्थेचे नाव बदलूनते ' वधवा- ववाह- प्रतिबंध- निवारक मंडळी' असे केले. म्हणजे वधवा ववाहास उत्तेजन नको पण त्यासाठी असलेला प्रतिबंध समाजाने दूर करावा असा त्याचा अर्थ होतो. हे वचार लोकांपर्यंत पोहचवण्याचे समाजकार्य त्यांनी केले. त्यासाठी पुन र्ववाहाच्या प्रश्नांसंबंधी लोकांमध्ये जागृती निर्माण केली त्यांच्या वचारांमध्ये मत परिवर्त न व्हावे म्हणून प्रयत्न केले. त्यामुळे अनेक वधवांचे पुन्हा ववाह होऊ शकले व त्यांचे वधवेचे कष्ट प्रद जीवन संपून त्यांना आनंदी जीवन जगण्याचे क्षण अनुभवता आले. पुढे जाऊन त्यांनी पं. रमाबाईंचे कार्य जवळून अभ्यासले . वधवांचे केवळ पुन र्ववाह करून स्त्रियांचा प्रश्न समूळ सुटणार नाही. त्यापेक्षा त्यांना शक्षण दिल्यास वधवांना कष्टमय स्थितीतून बाहेर काढता येईल असा वचार करून म. कर्वे यांनी वधवा शक्षणाच्या कार्याची नवीन धुरा हाती घेतली. शक्षणाने माणसाची बु द्ध व वचार यामधे अमुलाग्र बदल होतो या न्यायाने त्यांनी पं.रमाबाईंचे वधवा शक्षणाचे कार्य पुढे नेण्याचा प्रयत्न केला व १८९६ साली 'अनाथ बा लका श्रमाची मंडळी 'ही संस्था स्थापन करून स्त्री शक्षणाच्या कार्यास सुरूवात केली. यासाठी प्रथम स्वतःजवळचे पैसे खर्च केले. पुण्यात सदा शव पेठेत पेरू गेट जवळील गोरे वाड्यात केवळ एका वधवेस शकवायला सुरूवात केली. पुढे याचे महिला वद्यालयात रूपांतर झाले. वधवांसाठी वसतिगृहाची सोय केली. पत्नी आनंदीबाई यांचीही मदत मळाली आ ण स्त्री शक्षणाचे कार्य वेगाने वाढत गेले. वधवांची संख्या हळुहळू वाढत होती त्यांचा खर्च भागवण्यासाठी पायपीट करून वर्गणी गोळा केली. पुढे वर्गणी गोळा करण्याचे काम त्यांची मेहुणी पार्वतीबाई आठवले यांनी हाती घेतले. अनाथ आश्रमाचे काम महिलांनी पुढाकार घेऊन करावे अशा वचाराने म. कर्वे यांनी स्त्रियांना प्रोत्साहन दिले व त्यांची या कामासाठी मदत घेतली. आनंदीबाई कर्वे, पार्वतीबाई आठवले, वेणूबाई नामजोशी, काशीबाई देवधर, आनंदीबाई मराठे, दुर्गाबाई कर्लोस्कर अशा अनेक स्त्रिया साक्षर झाल्या व म. कर्वे यांच्या कार्यात सामावून गेल्या. आश्रमाचे कार्य जोमाने चालू असताना म. गांधी व इतरही अनेक मान्यवरांनी पुण्यात येऊन आश्रमाला भेटी दिल्या. म. कर्वे यांच्या कार्याचे कौतुक झाले. मुलींची संख्या वाढत गेली. निर्मनुष्य हिंगण्याच्या माळावर

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

वद्या र्थनींमुळे एक वसाहत निर्माण झाली. वधवांच्या केशवपनालाही त्यांनी वरोध केला. आ ण वधवांची मान सकता बदलण्यास सुरूवात केली. आपली वधवा मेहुणी पार्वतीबाई आठवले यांना वयाच्या चाळीशीनंतर सकेशाहोण्यास प्रवृत्त केले व इतर वधवांना उदाहरण घालून दिले की ज्यामुळे वधवांना केशवपनासारख्या अनिष्ठ रूढींपासून दूर करता आले. केशवपन हा वधवांच्या जीवनातील अति भयंकर प्रसंग होता. परंतु म. कर्वे यांच्या वचारांमुळे वधवांच्या वचारांवर चांगला परिणाम झाला व काही ठिकाणी वधवांनी केशवपनास नकार दिला. अनाथ बा लका श्रमाचे पुढे हिंगणे स्त्री शक्षण संस्थेत रूपांतर झाले. संस्थेची दिवसेंदिवस प्रगती चालू होती. सन १९३९ मधे संस्थेने आणखी एक समाजोपयोगी उपक्रम हाती घेतला. परित्यक्ता स्त्रियांना शक्षण देऊन स्वावलंबी बन वणे आ ण जुव्हेनाइल कोर्टामार्फत येणार्या पोरक्या मुलामुलींची राहण्याची व शक्षणाची सोय करण्याचा प्रयोग सुरू केला. अशा पोरक्या मुलांकरिता सरससून डेव्हिड फंडातून स्वतंत्र नवीन वसतिगृह बांधले. आजही अशा १२० वद्या र्थनी संस्थेत शक्षण घेत आहेत. आश्रमातील मुलींवर उत्तम संस्कार व्हावेत म्हणून काही उपक्रम राब वले. दररोज सकाळी प्रार्थना व रात्री सर्वमुलींना एकत्र करून भक्ती, परमार्थ, वैराग्य या वषयांची काही पद्ये म्हणणे, उपदेश पर पौरा णक ग्रंथाचे वाचन करणे असा नित्यक्रम होता. तसेच संसारापयोगी कामे वाटून देऊन करवून घेतली जात असत. वधवांबरोबर कुमारिका वसुवा सनी वद्या र्थनीही आश्रमातील येऊ लागल्या तेव्हा सर्वमुलींसाठी नवीन शाळा म. कर्वेयांनी सुरू केली. ४मार्च१९०७रोजी लकडी पुलाजवळ जुन्या वाड्यात सहामुलींना प्रवेश देवून पहिली शाळा काढली. शक्षणासाठी येते असलेल्या पालकांकडून मुलींचे वय वीस वर्षे होईपर्यंत लग्न करणार नाही असे वदवून घेत असत. त्यासाठी ब्रह्मचर्यफंडाची कल्पना आमलात आणली. त्यामुळे कुमारिकांच्या लग्नाची वयोमर्यादा वाढण्यास मदत झाली व बाल ववाहास प्रतिबंध करता आला. याचबरोबर प्रौढ मुलींना शक्षण मळावे म्हणून ही म. कर्वे यांनी प्रयत्न केले. त्यांचा हा प्रयोग ही यशस्वी झाला. स्त्री शक्षण वषयक म. कर्वे यांचे वचार अंत्यत दूरदर्शी होते स्त्रीने शक्षण घ्यावे परंतु तेवढ्यावर थांबून न रहाता इतर स्त्रियांनाही शक्षणासाठी सहकार्य करावे असे त्यांना वाटत होते. या तत्वानुसार काम करण्याची तयारी असलेल्या स्त्रियांचा एक संघ निर्माण करावा ही कल्पना त्यांच्या मनात आली. १९०८ साली त्यासाठी त्यांनी' 'निष्काम- कर्म- मठाची' स्थापना केली. याचा मुख्य हेतू हे की, आश्रमातील मुलींनी वद्यासंपादन करून आपल्या देशभ गनींच्या उपयोगी पडावे, आश्रमासारख्या संस्थांना मदत करावी, स्वार्थ त्यागाच्या भावनेने आपले आयुष्य स्त्री शक्षणाच्या कार्याला अर्पण करावे, आ ण खरोखर अशा वद्या र्थनी तयार झाल्या. निष्काम-कर्म-मठाची वाटचाल सुरू झाली. अनेक से वका निर्माण झाल्या. पुढे हा मठ आश्रमात समा वष्ट झाला. परंतु त्यामुळे म. कर्वे यांना स्त्री शक्षणाच्या कार्यास निस्वार्थ भावनेने मदत करणार्या स्त्रिया मळाल्या .पुढे अनाथा श्रम, महिला वद्यालय व निष्काम-कर्म-मठ मळून 'महिला श्रम' असे सुयोग्य नाव शाळेला मळाले जी शाळा आजही ४५०० हजार वद्या र्थनीसह उत्तमरित्या चालू आहे. स्त्री शक्षण, वधवा शक्षण, गरीब गरजू, अशा असंख्य मुलींच्या शक्षणासाठी समाजाकडून निधी जमा करावा या हेतूने बापूसाहेब चपळूणकर यांच्या कल्पनेतून 'भाऊबीज फंड' ही योजना निर्माण झाली. वद्या र्थनींनी समाजातील उदारदात्यांपर्यंत जाऊन शक्षणासाठी वर्गणी जमवावी हा उपक्रम फायदेशीर ठरला. आज ९० वर्षे 'भाऊबीज निधी ' हा उपक्रम अ वरत पणे चालू आहे. वर्षभरातील जमवलेला निधी संस्थेस अर्पण करण्यात येतो. २० डसेंबरया दिवशी' भाऊबीज निधी समर्पण सोहळा' साजरा केला जातो. मुलींना केवळ शालेय शक्षण देऊनच म.कर्वे थांबले नाहीत .तर परदेशाप्रमाणे आपल्या देशातही स्त्रियांना उच्च शक्षण मळावे म्हणून त्यांनी १९१६ साली महिला वद्यापीठाची कल्पना मांडली जपान मधील महिला वद्यापीठाची पाहणी करून, भारतात आपल्या भाषणाद्वारे हे वचार लोकांपर्यंत पोहचवले आ ण स्त्रियांना उच्च शक्षण मळावे म्हणून "अ खल भारतवर्षीय महिला वद्यापीठाची स्थापना केली. त्यासाठी स्वतंत्र' अभ्यास क्रम तयार केला. मातृभाषेतून शक्षण घ्यावे असा आग्रह धरला.

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

स्त्रिया पदवीचे  शक्षण घेऊ लागल्या. सुरूवातीला  वरोध झाला परंतु नंतर त्याचे महत्त्व समाजास पटले. आ ण अनेकांनी पाठिंबा दिला  वशेषतः ठाकरसी कुटुंबी यांना कडून  वद्यापीठासाठी भरघोस देणगी  मळाली. आ ण  वद्यापीठास मूर्त स्वरूप प्राप्त झाले. म. कर्वे यांनी देशभर प्रवास करून महिला  वद्यापीठाचे महत्त्व लोकांपर्यंत पोहोचवले . आ ण मुली साक्षर , स्वावलंबी, सक्षम, धाडसी बनू लागल्या. त्यांचे स्त्री  शक्षणाचे स्वप्न साकार झाले. अनेक मुलींमधे समाजसेवेची आवड निर्माण झाली, स्त्रियांमधे स्वावलंबन, सहकार्य, आत्म वश्वास, जिद्द,  चकाटी असे सद्गुण संक्र मत झाले ज्याचा फायदा पुढे जाऊन कुटुंबव्यवस्था, समाज व्यवस्था व देशालाही झाला. सन १९३६ मधे म. कर्वे यांनी  'महाराष्ट्र-ग्राम-प्राथ मक- शक्षण-मंडळ' स्थापन करून शहरी भागाप्रमाणे ग्रामीण भागातील स्त्रियांनाही  शक्षणाची संधी  मळावी म्हणून प्रयत्न केले. महाराष्ट्रात एकूण ५० शाळा सुरू झाल्या. खेडेगावात साक्षरता प्रसार व्हावा हा या मागील हेतू होता. १९३५ ते १९४७पर्यंत त्यांचे हे काम चालू राहिले. १९३८ म. कर्वे यांच्या ८० व्या वाढदिवसानि मत्त मुलींसाठी एक  नवीन उपक्रम सुरू केला. शहरी भागातील मुलींना  क्रडा प्रकारात संधी  मळावी म्हणून 'पूना गर्ल्स स्कूल स्पोर्टस् असो सएशन' नावाची  संस्था स्थापन केली त्या  माध्यमातून दरवर्षी  व वध  क्रडास्पर्धा आयोजित केल्या जात असत   शक्षणाबरोबर मुलींना खेळातही सहभागी होता आले.  त्यामुळे मुलींचा सर्वांगीण  वकास झाला. सतत ८० वर्षे ह्या  स्पर्धा चालू आहेत.  म. कर्वे यांचा मुलगा र. धो. कर्वे यांनी त्यावेळी  समाज स्वास्थासाठी कुटुंब नियोजनाचेकार्य हाती  घेतले यासामाजिक कार्यासही त्यांनी पाठिंबा दिला. समाजातील पी डत  ,  रितीपरंपरांनी नाडलेल्या स्त्रीचा उद्धार हेच त्यांनी  आपले कार्यक्षेत्र  मानले वयाच्या ८० वर्षानंतरही  ते  शांत  बसले नाहीत. तर  समाजात  समतेच्या  तत्वाचा प्रसार करण्यासाठी त्यांनी सन  १९४४ साली 'समता संघाची' स्थापना केली. त्या संबंधी म.कर्वे आपल्या आत्मवृत्तात म्हणतात "आपणाला  मळालेले  स्वातंत्र्य जर  टिकवायचे असेल तर आपल्या हाडीमाशी  खळलेला जातीय वाद प्रथम नष्ट केला पाहिजे त्यामुळे समाजाचीच नव्हे तर सबंध देशाची हानी होणार आहे. या  जातीय वादाच्या मुळाशी धा र्मक भावना व  रूढींचे दडपण असल्याने त्या नष्ट करण्याकरिता रोटी-बेटी व्यवहारसर्रास सुरू झाला  पाहिजे. धर्म हा  परिवर्तनीय आहे ही  समजूत पटवून देऊन हा जातीय वाद नष्ट केला तरच पुढील काळात तरणोपाय आहे."

उद्दिष्ट क्र **1:**

म**.** कर्वे यांच्या सामाजिक कार्याचा  अभ्यास  करणे**.** म. कर्वे यांचे आत्मचरित्र व  जीवन  चरित्रे अभ्यासल्यानंतर त्यांच्या सामाजिक कार्याची सखोल माहिती  मळाली. त्यानुसार त्यांचे सामाजिक कार्य थोडक्यात:

१)१८८९- मुरूड फंडाची  स्थापना

२)१८९१- मुरुड गावात इंग्रजी  शाळा सुरू

३)१८९३-  वधवा पुन र्ववाह

४)१८९३-  वधवा  ववाहोत्त्तेजक मंडळीची  स्थापना

५)१८९६- अनाथ बा लका श्रमाची मंडळी स्थापना

६)१९०७- महिला वद्यालयाची स्थापना

७)१९०७- प्रौढ   शक्षण   वर्ग  सुरु

८)१९०८- निष्काम-कर्म-मठाची स्थापना  वद्यापीठ

९)१९१६- भारतवर्षीय महिला   वद्यापीठाची स्थापना

१०)१९१७- अध्या पका  वद्यालयाची स्थापना

११)१९१८-भाऊबीज फंड सुरू

१२)१९३६- महाराष्ट्र-ग्राम-प्राथ मक- शक्षण-मंडळाची स्थापना

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

१३)१९३८- पूनागल्स स्कूलस्पोर्टस् असो सएशन

१४)१९४४-समता संघाची स्थापना

उद्दिष्टक्र **2:**

म. कर्वे यांच्या सामाजिक कार्याचे मूल्यमापन करणे.


प्रश्नावलीच्या आधारे म.कर्वे यांच्या सामाजिक कार्याचे मूल्यमापन –

<u>प्रश्न १</u>- महर्षी कर्वे यांचे कार्य खालीलपैकी कोणत्या बाबतीत महत्वाचे वाटते?

पर्याय -

अ. शैक्ष णक ब. सामाजिक क. कौटुंबिक ड. आ र्थक

| क्र. | पर्याय | टक्केवारी(% ) |
|---|---|---|
| अ | शैक्ष णक | ८८ |
| ब | सामाजिक | ९८ |
| क | कौटुंबिक | ७८ |
| ड | आ र्थक | ६८ |




अर्थनिर्वचन: उपरोक्त आलेखावरून असे लक्षात येते की म.कर्वे यांचे कार्य शैक्ष णकदृष्टया सर्वात जास्त महत्वाचे वाटते व त्या खालोखाल त्यांचे कार्य सामाजिक दृष्ट्याही महत्वपूर्ण ठरते.

स्पष्टीकरण : म.कर्वे यांचे स्त्री शिक्षणाचे कार्य अजोड आहे. परंतु त्या बरोबर त्यांनी समाजसेवा व समाजसुधारणेसही प्राधान्य दिले त्यामुळे त्यांचे सामाजिक कार्यही लक्षणीय ठरते .


प्रश्न २ - महर्षी कर्वे संस्थेत शिक्षण घेतल्यामुळे कोणता फायदा झाला ?

पर्याय -

अ. अर्थार्जन ब. संस्कार

क. कौटुंबिक जबाबदारी ड. स.सेवा,बचत इ. गुण.

| क्र | पर्याय | टक्केवारी(% ) |
|---|---|---|
| अ | अर्थार्जन | ८२ |
| ब | संस्कार | ९० |
| क | कौटुंबिक जबाबदारी | ९० |
| ड | स.सेवा,बचत इ. गुण | ८२ |




अर्थनिर्वचन : म. कर्वे स्त्री शिक्षण संस्थेत शिक्षण घेताना मुलींवर शिक्षणाबरोबर संस्कार झाले हे दिसून येते. अशा सुसंस्कारांमुळे स्त्रिया आपल्या कुटुंबाची जबाबदारी उत्तम रितीने पार पाडू शकल्या असे वाटते.

स्पष्टीकरण: उत्तम संस्कारांबरोबर कुटुंबाची योग्य देखभाल स्त्रिया करू शकल्या. या शवाय अर्थाजन करून संसाराला हातभार लावू शकल्या. आपल्या कुवतीप्रमाणे समाजसेवा करावी व बचतीची सवय लावण्यासही मदत झाली. ९०%स्त्रियांनी उत्तम संस्कार व कौटुंबिक जबाबदारी पार पाडण्यासाठी शिक्षण उपयोगी ठरले असे मत नोंदवले आहे.

निष्कर्ष:

एकंदरीत तत्कालीन समाजातील व वध समस्यांची जाण ठेऊन म.कर्वे यांनी स्त्री शिक्षण, वधवा पुन र्वाह, प्रौढ शिक्षण, केशवपनास प्रतिबंध, जातीभेद निर्मूलन, संस्कारक्षम उपक्रम, निष्काम-कर्म-मठ, महिला वद्यालय, महिला वसतिगृह, मातृभाषेस प्राधान्य, समाजा भमुख अभ्यासक्रम महिला वद्यापीठाची स्थापना ,समानतेचा प्रसार अशा अनेक महत्वपूर्ण गोष्टींचा दूरदर्शीपणे वचार करून त्यासंबंधी तन-मन-धन अर्पण करून अ वरत कार्य केले. त्यात त्यांना अभूत पूर्वयश मळाले. त्यांच्या या अतुलनीय कार्याबद्दल भारत सरकारने त्यांना सन १८५८ मधे 'भारतरत्न' हा सर्वोच्च पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. १४ जून १९९६ रोजी संस्थेच्या शतक महोत्सवी कार्यक्रमात अध्यक्षीय भाषणातून वधान परिषदेचे सभापती मा. जयंतराव टिळक यांनी म.कर्वे यांचा पुढील शब्दात गौरव केला ते म्हणाले "लोकमान्य कर्मयोगी होते तर महर्षी कर्वे समयोगी होते. त्यांनी समानतेचा ध्यास घेतला होता. स्त्री-पुरूष,

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

जाती-जमाती, सुख-दु:ख यातील भेदाभेदांवर मात करण्याचा त्यांचा निर्धार होता तो त्यांनी कायम ठेवला. “म. कर्वे स्त्री शिक्षणाचे प्रणेते या पुस्तकात मालती ताई देशपांडे लहितात “म. कर्वे कोण होते? शिक्षक? प्राध्यापक? समाजसेवक? समाज शिक्षक? समाजसुधारक? की आधुनिक संत; खरंतर ते सर्व काही होते. “स्त्री शिक्षणाच्या कार्याबरोबरच म.कर्वे यांनी समाजसुधारणेचे ही काम केले. म्हणून ते महर्षी ही होते आ ण समाज सुधारक ही”.

संदर्भसूची:

देशपांडे मालती ,स्त्री शिक्षणाचे प्रणेते महर्षी कर्वे ,महर्षी कर्वे स्त्री -शिक्षण संस्था ,पुणे शतक महोत्सव प्रकाशन (१९९७)

आत्मवृत्त व चरित्र ,कर्वे व पटवर्धन ,भास्कर धोंडो कर्वे , चटणीस ,महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था (१९५८)

स्मर णका -शताब्धी वर्ष २००६-२००७ ,महिलाश्रम हायस्कूल ,कर्वेनगर पुणे ५२

खोले वकास ,महर्षी धोंडो केशव कर्वे,मेजेस्तिक पब्ली शंग हाउस ,ठाणे ,द् वतीय आवृत्ती (ऑक्टो २०१५)

कर्वे आनंदीबाई ,माझे पुराण ,महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था ,पुणे ,चतुर्थ आवृत्ती (२०१४)

आठलेकर मंगला ,महर्षी ते गौरी (स्त्री शिक्षणाची वाटचाल ),राजहंस प्रकाशन ,पुणे ,प्रथमावृत्ती (१९९९)

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*